वाचले :-

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारित तरतूदी.

२) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दिनांक ०७ मे,२०२१.

३) पदोन्नती समिती सभा दि.३०/११/२०२२ चा सभावृत्तांत.

४) मा.अति.आयुक्त, सो. यांचा दि.०५/०१/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८
माध्य/शि/०१/कावि/ ०४ /२०२२
दि.०५/०१/२०२३

विषय –"मुख्याध्यापक" पदावरील पदोन्नतीबाबत......

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'मुख्याध्यापक' या अभिनामाची पदे पे.लेवल S-१७ वेतनश्रेणी ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरणेकामी दि.३०/११/२०२२ रोजी पदोन्नती समितीसभा आयोजित करणेत आली होती.प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व 'मुख्याध्यापक' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता,अनुभव कालावधी,सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मालमत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून,सहा.शिक्षक पदावरील कर्मचा-यांना पदोन्नतीचेआरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच दि.०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णयास अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात जेष्ठतेनुसार "मुख्याध्यापक" पदावर पे.लेव्हल S-१७ वेतनश्रेणी ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीत पदोन्नती देणेस शिफारस केली आहे.

| अ. क्र. | अधिका-यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नती मुळे द्यावयाचा आस्थापनेचे विद्यालय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्रीम.गुंजेगावकर मधुमती गौरीशंकर | जेष्ठतेनुसार | माध्यमिक विद्यालय,नेहरूनगर |
| २ | श्री.आल्हाट बाळासाहेब मारूती | जेष्ठतेनुसार | माध्यमिक विद्यालय,भोसरी |
| ३ | श्री.पानसरे संपत गोविंद | जेष्ठतेनुसार | माध्यमिक विद्यालय,कासारवाडी |
| ४ | श्री.फुगे अरूण विष्णू | जेष्ठतेनुसार | माध्यमिक विद्यालय,लांडेवाडी |

सबब,मी अतिरिक्त,आयुक्त-(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करणे संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.०७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन राहून उपरोक्त नमूद सहा.शिक्षक पदावरील कर्मचा-यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मुख्याध्यापक या पदावर पे.लेव्हल S-१७ वेतनश्रेणी ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे.तसेच त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या विद्यालयामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

अटी –

१) सदरची पदोन्नती ही प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरिता (Probation Period) पुर्णत: हंगामी स्वरूपात राहील. परिविक्षाधिन कालावधीत कामकाज हजेरी,वर्तणुक असमाधानकार वाटल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता पदोन्नतीपुर्व सहाय्यक शिक्षक या पदावर पदावनत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन-२६९८-११७९२-(१४०-९८) माशि-२,दि.१३ जून २००५ नुसार एक वर्षाचा शालेय व्यवस्थापन पदविका (DSM) अभ्यासक्रम वरील अट क्र.१ वरील कर्मचा-यांची पदोन्नती पासून १ वर्ष कालावधीत पुर्ण करणे बंधन कारक राहील.सदर अभ्यासक्रम मुदतीत पुर्ण न केल्यास देण्यात आलेली पदोन्नती रद्द करण्यात येऊन वरीष्ठ पदाचे दिलेले वेतन वसुल करणेत येईल.

३) सदर पदोन्नती आपण सादर केलेल्या कागदपक्षांच्या आधारे दिलेली असून, त्यात तफावत आढळल्यास अथवा प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास सदरची पदोन्नती रद्द करण्यात येईल.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधिताचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

(प्रदिप भोसले पाटील)
अतिरिक्त आयुक्त - (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८.

प्रति,सर्व संबंधित

प्रत,

१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण

३) सर्व संबंधित विद्यालये ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

५) माध्यमिक शिक्षण विभाग टेबल क्र.२ व ३.

उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे-१८.